दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • गुरुवार दि.५ फेब्रुवारी २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १६१ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Thrusday 5 Feburary 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 161 • Pages 4 • Rate 4 Rs


## राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावर बोलण्याचा देवेंद्र फडणवीसांना अधिकार काय?

**मुंबई–** राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर पलटवार केला आहे. ते म्हणाले की, सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्याबद्दल मला आनंद आहे. अजित पवार आणि जयंत पाटील यांच्यात दोन्ही पक्षांच्या विलीनीकरणाबाबत चर्चा झाली होती. मुख्यमंत्री फडणवीस त्या चर्चेत सहभागी नव्हते. मग त्याबद्दल बोलण्याचा त्यांना काय अधिकार होता? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.बारामती येथे झालेल्या पत्रकार परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी भारत आणि अमेरिका यांच्यातील नव्या व्यापार कराराबाबत सावधगिरीचा इशारा दिला.

# मी राष्ट्रवादीचा अध्यक्ष होणार नाही:प्रफुल्ल पटेल यांची स्पष्टोक्ती


## आज आमच्यापुढे विलीनीकरणाचा कोणताही प्रश्न नसल्याचेही केले स्पष्ट

**सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी अजित पवार यांच्या निधनानंतर आपण पक्षाच्या अध्यक्षपदाच्या शर्यतीत नसल्याचे स्पष्ट केले आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर कोण? काय? कसे? कुठे हे पाहण्याची जबाबदारी माझी आहे. त्यामुळे मी स्वत: राष्ट्रवादी काँग्रेसचा अध्यक्ष होणार नाही हे स्पष्ट आहे, असे ते म्हणालेत. आज आमच्यापुढे विलीनीकरणाचा कोणताही प्रश्न नसल्याचेही त्यांनी यावेळी प्रामुख्याने अधोरेखित केले. त्यामुळे अजित पवारांच्या पश्चात राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांत सुरू असणारी विलीनीकरणाची कथित चर्चा पुढे सरकणार नसल्याचे हे आता स्पष्ट झाले आहे.राष्ट्रवादी काँग्रेसच्या केंद्रीय कार्यालयात आज अजित पवारांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना प्रफुल्ल पटेल म्हणाले, आम्ही आमच्या पक्षाचे ज्येष्ठ नेते, सुनील तटकरे, छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे आदी नेत्यांशी संवाद साधून आम्ही सुनेत्रा पवार यांच्या घरी गेलो. त्यांची पार्थ व जय पवार ही दोन्ही मुले तिथे होती. आम्ही त्यांचे सांत्वन करत राष्ट्रवादी काँग्रेस खंबीरपणे तुमच्या व तुमच्या कुटुंबाच्या पाठिशी आहे. ही आमची व जनतेचीही भावना आहे की, आपण ही जबाबदारी स्वीकारावी. त्यावर सुनेत्रा पवारांनी आमच्या विनंतीला मान दिला.**

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई | प्रतिनिधी**

सुनेत्राताई मुंबईला आल्या. त्यांनी पवार कुटुंबात ३ दिवसांचा दुखवटा असल्याचे सांगितले. त्यानंतर चौथ्या दिवशी त्या आल्या. त्यानंतर आम्ही त्यांची निवड केली. त्यानंतर त्यांचा शपथविधी झाला. आमच्या अंतर्गत प्रश्नांवर सध्या उलटसुलट चर्चा सुरू आहेत. आम्ही आमच्या पक्षाचे नेते निवडणार की, दुसरा एखादा व्यक्ती निवडणार? आम्ही एक पक्ष आहोत. त्याचे दोन पार्ट आहेत. पहिला पार्ट आहे विधीमंडळ व दुसरा पार्ट आहे राजकीय पक्ष. विधीमंडळाचा पार्ट संपला. आता अनेक लोकांची विधाने येत आहेत, असे ते म्हणाले.प्रफुल्ल पटेल यांनी यावेळी अजित पवारांच्या निधनानंतर पक्षाची सर्व प्रक्रिया व्यवस्थितपणे पार पाडण्याची जबाबदारी आपल्यावर असल्याचेही यावेळी स्पष्ट केले. ते म्हणाले, एका केंद्रीय मंत्र्याने चुकून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून माझ्या नावाचा उल्लेख केला. नंतर त्यांनी त्यावर खेदही व्यक्त केला. मी पक्षाचा कार्याध्यक्ष आहे. त्यामुळे अजित पवार यांच्या निधनानंतरच्या सर्व प्रक्रिया व्यवस्थित पार पाडण्याची जबाबदारी माझ्यावर आहे. विधीमंडळ किंवा राष्ट्रीय अध्यक्षाचा विषय मार्गी लावण्याची जबाबदारी व प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी माझ्यावर आहे. महाराष्ट्रात ही जबाबदारी सुनील तटकरे यांच्यावर आहे.आम्हाला सर्वांच्या भावना समजतात. त्यानुसार आम्ही सुनेत्राताईंचा निर्णय घेतला. आता पक्षाचाही निर्णय त्यानुसारच घेतला जाईल. सध्या काही लोक ज्यांचा पक्षाशी कोणताही संबंध नाही, ते आमच्याविषयी उलटसुलट चर्चा करत आहेत. माझ्या वडिलांना महाराष्ट्राच्या जनतेने निवडून दिले होते. मी स्वतःही महाराष्ट्राच्या जनतेच्या बळावर लोकसभेवर निवडून गेलो. आमच्या बद्दल व आमच्या पार्श्वभूमीविषयी कुणी कमेंट्स करत असेल, तर त्याला लाज वाटली पाहिजे. मी महाराष्ट्राचा एक लोकप्रतिनिधी म्हणून येथे बसलो आहे, असे ते म्हणाले.मी कोणत्याही शर्यतीत नाही. मी कधी याविषयी विधानही केले नाही. माझ्या पक्षाच्या एकाही नेत्याने यासंबंधी माझे नाव घेतले नाही, असे ते म्हणाले.पत्रकारांनी यावेळी पटेलांना अजित पवारांचे अर्थखाते राष्ट्रवादीलाच मिळणार काय? असा प्रश्न केला. त्यावर ते म्हणाले, आमची मुख्यमंत्र्यांसोबत जी चर्चा झाली, त्यामध्ये त्यांनी सांगितले की, सुनेत्रा पवार महाराष्ट्र सरकारचा घटक म्हणून नवीन आहेत. त्यांना बाकीच्या प्रक्रिया समजण्यास थोडा वेळ लागेल. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, ते काही दिवसांमध्ये बजेट मांडणार आहेत. कसे असते की, अर्थसंकल्प फक्त बोलण्याचेच काम नसते. त्यावर चर्चा होते. त्याला उत्तर द्यावे लागते. अर्थसंकल्प तयार करण्याची प्रक्रियाही मोठी असते. अजित पवारांना प्रदीर्घ अनुभव होता. त्यामुळे त्यांना काही अडचण नव्हती.पण सुनेत्रा वहिनींना थोडा वेळ लागेल. म्हणून ते (मुख्यमंत्री फडणवीस) म्हणाले की, अर्थसंकल्पीय अधिवेशन होऊ द्या. मी सांभाळतो. तात्पुरते अर्थ खाते मी सांभाळतो. नंतर सुनेत्रा वहिनींशी बोलून, तुमच्यासोबत बोलून शेवटी अंतिम निर्णय तुम्हाला योग्य वाटेल तसा करु.



### मी पक्षाध्यक्षपदाच्या शर्यतीत नाही

**प्रफुल्ल पटेल यांनी यावेळी पक्षाच्या अध्यक्षपदाच्या शर्यतीत आपण नसल्याचेही स्पष्ट केले. ते म्हणाले, पक्षाचा निर्णय योग्य पद्धतीनेच होईल. योग्य दिशेनेच होईल. योग्य व्यक्तीचाच होईल व माझ्याशिवायच होईल. आता याहून अधिक काय बोलू. आमच्याकडून एकही विधान आले नसताना उगीच या प्रकरणी वादळ निर्माण करणे व आमच्या पक्षामध्ये संशय निर्माण करणे ही अत्यंत घाणेरडी गोष्ट आहे. मला याविषयी अजिबात फार काही बोलायचे नाही. आम्ही या प्रकरणी योग्य तो निर्णय घेऊ, असे ते म्हणालेत. पत्रकारांनी यावेळी त्यांना तुम्ही अध्यक्षपदाच्या शर्यतीत नाही का? असा प्रश्न केला. त्यावर त्यांनी सकारात्मक उत्तर दिले.**

### राज ठाकरे वाकरे हे माझ्या पक्षाशी संबंधित आहेत का?

**प्रफुल्ल पटेल मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पोस्टवर बोलताना म्हणाले, राज ठाकरे वाकरे हे माझ्या पक्षाशी संबंधित आहेत का? माझ्या पक्षाचा विधीमंडळ नेता कोण व अध्यक्ष कोण हे आम्ही ठरवणार. राज ठाकरे किंवा सकाळी ९ वाजताचे बुलेटिन यांनी आम्ही काय करावे हे सांगू नये. आम्ही योग्य निर्णय घेण्याच्या प्रोसेसमध्ये आहोत. या लोकांनी आम्ही आमच्या पक्षात काय करावे हे सांगू नये. आम्ही पहिला निर्णय योग्य निर्णय घेतला असून, दुसरा निर्णयही योग्यच घेण्याच्या प्रक्रियेत आहोत.**

# दहावी बारावी परीक्षांसाठी बीड जिल्हा हाय अलर्ट मोडवर

## कॉपीबाजांवर अजामीनपात्र कारवाई

दैनिक वादळ वार्ता

**बीड | प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात फेब्रुवारी मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षांदरम्यान कॉपी करणाऱ्यांना कोणतीही सूट दिली जाणार नाही असा कडक इशारा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिला आहे. कॉपीमुक्त अभियानांतर्गत जिल्हा प्रशासनाने अत्यंत कठोर आणि धडकी भरवणारी यंत्रणा उभी केली असून यंदा परीक्षा केंद्रांवर गैरप्रकार करणे अशक्यप्राय ठरणार आहे.




जिल्ह्यातील प्रत्येक परीक्षा केंद्रावरील प्रत्येक वर्गखोलीत सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार असून संवेदनशील केंद्रांवर आवाज रेकॉर्डिंगसह सीसीटीव्ही कार्यान्वित राहणार आहेत. या सर्व यंत्रणेवर जिल्हास्तरीय कंट्रोल रूममधून थेट नजर ठेवली जाणार आहे. संशयास्पद हालचाल आढळताच तात्काळ कारवाई केली जाणार आहे.संवेदनशील परीक्षा केंद्रांवर केंद्रसंचालक व पर्यवेक्षकांची अदलाबदल करण्यात येणार असून महत्त्वाच्या विषयांच्या दिवशी भरारी पथक व बैठे पथकांकडून अचानक तपासण्या केल्या जाणार आहेत. ड्रोन कॅमेऱ्यांच्या सहाय्याने परीक्षा केंद्र परिसरावर सतत नजर ठेवली जाणार आहे.परीक्षा केंद्रावर ओळखपत्राशिवाय कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. अनधिकृत व्यक्तींना केंद्र परिसरात प्रवेश करण्यास सक्त मनाई असून आदेशाचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई करण्यात येणार आहे. परीक्षा केंद्रापासून पाचशे मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर्स परीक्षा कालावधीत पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहेत.कॉपी प्रकरणात विद्यार्थी शिक्षक किंवा बाहेरील व्यक्ती कोणीही दोषी आढळल्यास त्यांच्यावर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हे दाखल करण्यात येणार असून जामीन मिळणे कठीण होणार आहे. प्रशासन कोणावरही दया दाखवणार नाही असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी परीक्षांचा पारदर्शकपणा टिकून राहावा आणि शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास अबाधित राहावा यासाठी कॉपीमुक्त अभियान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले. पालक शिक्षक अधिकारी आणि नागरिकांनी या अभियानात सक्रिय सहकार्य करावे असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# प्रशासनाकडून न्यायालयाच्या आदेशाची पायमल्ली?

## बीड शहरातील रिक्षा थांब्यांचा प्रश्न अजूनही अधांतरी!

दैनिक वादळ वार्ता

**बीड | प्रतिनिधी**

बीड शहरातील रिक्षा चालकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या अधिकृत रिक्षा स्टँड उभारणीबाबत जिल्हा प्रशासन आणि नगर परिषद प्रशासन कमालीचे उदासीन असल्याचे दिसून येत आहे. उच्च न्यायालय संभाजी नगर यांनी बीड जिल्हा परमीट मालक चालक ऑटो रिक्षा संघटना यांच्या बाजूने निकाल देऊन आणि जिल्हाधिकाऱ्यांना १८० दिवसांची मुदत देऊनही,एक ते दीड वर्ष उलटले तरी अद्याप एकही नवीन रिक्षा थांबा कागदावरून जमिनीवर उतरलेला नाही. नेमके प्रकरण काय ? बीड शहरातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी आणि रिक्षा चालकांना हक्काची जागा मिळवून देण्यासाठी रिक्षा संघटनेने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने रिक्षा संघटनेच्या बाजूने निकाल देत जिल्हाधिकारी कार्यालयाला १८० दिवसांच्या आत जागा निश्चित करून कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते. या संदर्भात संघटनेने ए-षषळलश (छे. १०८४५३२) द्वारे ४ डिसेंबर २०२३ रोजी पाठपुरावा देखील केला होता. नगर परिषदेची चालढकल मिळालेल्या माहितीनुसार, जिल्हाधिकारी कार्यालयाने यापूर्वीच नगर परिषद बीड यांना आदेश निर्गमित केले होते. मात्र, न्यायालयाच्या आदेशाची मुदत संपून एक ते दीड वर्ष झाले तरी नगर परिषद प्रशासनाने यावर कोणतीही ठोस पावले उचललेली नाहीत. प्रशासनाच्या या दिरंगाईमुळे रिक्षा चालकांना विनाकारण दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागत आहे, असा आरोप बीड जिल्हा परमीट मालक चालक ऑटो रिक्षा संघटनेने केला आहे. या २९ थांबे पैकी २१ मंजूर केले आहेत प्रमुख ठिकाणांवर रिक्षा थांब्यांची मागणी संघटनेने शहरातील गजबजलेल्या २१ ठिकाणांची यादी प्रशासनाने सादर केली आहे, ज्यामध्ये खालील प्रमुख ठिकाणांचा समावेश आहे १)बस स्टैंड इन गेट, २)आऊट गेट,३) साठे चौक, ४)कारंजा टॉवर, ५)बशीरगंज हनुमान मंदिराजवळ, ६)छ. शिवाजी महाराज पुतळा नगर रोड, ७)डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा, ८)माळीवेस चौक, ९)सरकारी दवाखाना, जिल्हा रुग्णालय परिसर, १०)बार्शी नाका पोलीस चौकी, ११)तेलगाव नाका आय टी आय समोर, १२) नाळवंडी नाका, १३)नवगण कॉलेज केसोना गॅस एजन्सी, तुळजाई चौक मातोश्री हॉस्पिटल १४)नगर नाका,१५) माने कॉम्प्लेक्स कारागृह बाजू, १६)अंबिका चौक, १७)राजीव गांधी चौक, १८)शिवराज चौक पश्चिम बाजू, १९)शिवशारदा बिल्डिंग मोंढा रोड, २०)चांदणी चौक नदी बाजू,२१) एस.बी.आय बँक सारडा कॅपिटल, असे थांबे मंजूर आहेत न्यायालयाचा अवमान होत असतानाही प्रशासन गप्प का? असा सवाल आता रिक्षा चालक विचारत आहेत. जर लवकरच या २१ जागांवर अधिकृत रिक्षा स्टँडचे फलक लावून जागा निश्चित केल्या नाहीत, तर तीव्र आंदोलनाचा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

# केज येथून १२० होमगार्ड जवान कोल्हापूरकडे रवाना

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक बंदोबस्तासाठी बीड ऐवजी केज तालुक्यातून १२० होमगार्ड जवानांना कोल्हापूर येथे पाठविण्यात आले. ही कार्यवाही मा. जिल्हा समादेशक श्री. संजय पांडकर साहेब यांच्या आदेशानुसार करण्यात आली.

या बंदोबस्तासाठी केंद्र नायक श्री. सुरेश झवेरी (बीड) यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच राऊत दिनकर, तालुका समादेशक केज यांच्या नेतृत्वाखाली होमगार्ड जवान कोल्हापूरकडे रवाना झाले.या वेळी आर एन चाटे प्लाटून कमांडर, गणेश वाघमारे, सुनील कुलकर्णी, ईश्वर लोंढे या अधिकारीयांचे निवडणूक प्रक्रिया शांततेत, सुरळीत व कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी या होमगार्ड दलाची महत्त्वपूर्ण जबाबदारी राहणार आहे.



# विद्यार्थ्यांच्या आरोग्या साठी जिल्हा परिषद शाळेतील स्वच्छता गृहाची दररोज साफसफाई बंधनकारक-प्रा.बबनराव आंधळे

दैनिक वादळ वार्ता

**बीड | प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमधील स्वच्छतागृहाची अवस्था वाईट झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्याची दररोज स्वच्छता झाली पाहिजे परंतु जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सेवक पदाला मंजुरी नाही मग ही कामे कोण करणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. शाळेमध्ये स्वतंत्र स्वच्छता कर्मचारीनियुक्त नसल्याने अनेक ठिकाणी स्वच्छता गृहाची साफसफाई होत नसल्याचे आढळून आले आहे याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होत आहे या पार्श्वभूमीवर ग्रामीण युवक संघटनेने ही मागणी केल्यानंतर तात्काळ जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी पंचायत समितीतील गटविकास अधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत.ग्राम पंचायत अंतर्गत कार्यरत असलेल्या स्वच्छता कामगारा मार्फत दररोज शाळेतील स्वच्छतागृहाची साफसफाई करण्यात यावी असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले आहेत तसेच संबंधित ग्रामसेवक, सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांना याबाबत सूचित करून कामात कोणतीही दिरंगाई होणार नाही याची दक्षता घेण्याचेही आदेश देण्यात आले आहेत या निर्णयामुळे जिल्हा परिषद शाळा मधील विद्यार्थ्यांचेआरोग्य सुरक्षित राहण्यास मदत होईल असा विश्वास ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिला आहे.



# संपादकीय

## महाराष्ट्राला लॉटरी

मुंबई, पुणे आणि नागपूर ही महाराष्ट्राची महत्त्वाची शहरे आणि येथेच सर्वाधिक प्रकल्प येत आहेत. त्यामुळे या केंद्रांना आर्थिक मदत दरवर्षी म्हणजे या केंद्रांची उर्जितावस्था आणून महाराष्ट्राला आणखी उंचीवर नेऊन ठेवण्यासारखे आहे.

केंद्रीय अर्थसंकल्पातून महाराष्ट्राला कर विनियोजनातून राज्याला ९८ हजार ३०६ कोटी रुपये मिळतील असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले, हे यासाठी महत्त्वाचे आहे. कारण आदित्य ठाकरे आणि विरोधी पक्षांनी केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राला काहीच मिळाले नाही असे रडगाणे लावले. त्याला उत्तर म्हणून फडणवीस यांचे विधान आणि संबंधित आकडेवारी महत्त्वाची आहे. ही रक्कम २०२५-२६ च्या अर्थसंकल्पातून मिळणाऱ्या रकमेपेक्षा २० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. तरीही आदित्य ठाकरे म्हणतात त्यामागे केवळ भाजपचा द्वेष आणि स्वतःला सत्ता मिळाली नाही ही खंत आहे, दुसरे काही नाही. महाराष्ट्राला इतकेच नव्हे, तर पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये जे १२.२ लाख कोटी रुपये गुंतवले जाणार आहेत त्यामध्येही महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. मुंबई, पुणे आणि नागपूर येथील प्रस्तावित विकासकेंद्रांना पुढील पाच वर्षांत ५ हजार कोटी रुपये मिळणार. मुंबई, पुणे आणि नागपूर हे महाराष्ट्राची महत्त्वाची शहरे आणि येथेच सर्वाधिक आस्थापना आणि विविध प्रकल्प येत आहेत. त्यामुळे या केंद्रांना आर्थिक मदत दरवर्षी म्हणजे या केंद्रांची उर्जितावस्था आणून महाराष्ट्राला आणखी उंचीवर नेऊन ठेवण्यासारखे आहे. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस किंवा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे जे म्हणतात महाराष्ट्राला खूप काही दिले आहे हे सत्य आहे. फडणवीस यानी सांगितले त्याप्रमाणे मुंबई, पुणे आणि हैदराबाद या हायस्पीड कॉरिडॉरमुळे महाराष्ट्राच्या विकासाला तर चालना मिळेलच, पण मराठवाडा आणि इतर जे मागास भाग आहेत त्यांच्या विकासाला हातभार लागणार आहे. हायस्पीड रेल्वेमुळे १७० किमीचा प्रवास अवघ्या ४८ मिनिटांत पूर्ण होणार. ग्रॅस नेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी अर्थसंकल्पावर टीका करताना म्हटले, की सुधारणांपेक्षा देखाव्याला प्राधान्य दिले. पण विरोधक म्हणून त्यांची टीकेत काही तथ्य नाही. कारण केंद्राने महाराष्ट्राला आणि देशाला भरपूर काही दिले. महाराष्ट्राला केवळ हायस्पीड रेल्वेच नव्हे, तर अर्थसंकल्पीय तरतुदीमुळेही लाभ होणार आहे. त्यातून महाराष्ट्राचा विकास साध्य होईल. उदाहरणार्थ ग्रामीण रस्त्यांसाठी ३७८ कोटी रुपये मिळणार आहेत, तर इकॉनॉमिक क्लस्टरसाठी २८३ कोटी रुपये आणि पाटबंधारे कामांसाठी २०७ कोटी रुपये. नियोजित शहरीकरण आणि उद्योग तसेच उद्योजकतेला प्राधान्य या द्वारे हा अर्थसंकल्प राज्याच्या शाश्वत विकासासाठी पाया मजबूत करत आहे. विरोधी पक्षांनी राज्याला या अर्थसंकल्पातून काय मिळाले असा सवाल केला. पण त्यांच्या माहितीसाठी ही आकडेवारी सांगणे आवश्यक आहे, की ९८ हजार ३०६ कोटी रुपये मिळाले. यातून महाराष्ट्राची वाटचाल आणखी गतिमान होईल यात शंका नाही. विकसित भारत बनवण्याचे जे पंतप्रधान मोदी यांचे लक्ष्य आहे त्या दिशेने जाणारा हा अर्थसंकल्प भक्कम आहे. उद्योगांना प्रोत्साहन आणि गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती यांना अर्थसंकल्पात देण्यात आलेले महत्त्व हे शाश्वत वाढीसाठी ठोस पाया आहे. पायाभूत क्षेत्रासाठी १२ लाख कोटी रुपयांची तरतूद ही महाराष्ट्राला मिळालेली भेट. त्याशिवाय कृषी, मत्स्य उत्पादनासाठी ५०० तलाव आणि पशुसंवर्धन यासाठी भरीव तरतुदी यामुळे ग्रामीण महाराष्ट्राचे चित्र नक्कीच पालटेल. एकूण महाराष्ट्राला या अर्थसंकल्पातून एक लाख कोटी रुपयांचा लाभ मिळणार आणि यामुळे विरोधकांचे विशेषतः आदित्य ठाकरे यांचे म्हणणे आहे, की महाराष्ट्राला काही मिळाले नाही ते असत्य आहे आणि विरोधक डोके शहामृगासारखे वाळूत खूपसून बसत आहेत असे दिसते. महाराष्ट्रावर टीका होत आहे. कारण महाराष्ट्र राष्ट्रीय खजिन्यात जास्तीत जास्त भर टाकतो आणि तरीही त्याकडे दुर्लक्ष केले जाते ही टीका सर्वथा गैरलागू आहे. शेतकऱ्यांना पुरेसा पाठिंबा नाही अशी टीका होते, पण अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी नारळ, काजू आणि इतर पीक उत्पादक शेतकऱ्यांसाठी बरेच काही आहे. शेतकऱ्यांसाठी काही नाही असे म्हटले तर मत्स्य तलाव, इतर पिकांसाठी अनुदान वगैरे तरतुदी आहे. हा अर्थसंकल्प पूर्ण महाराष्ट्रविरोधी आहे ही उबाठाच्या खासदाराने केलेली टीका ही अत्यंत चुकीची म्हणून विचारात न घेण्याजोगी आहे.विदर्भ आणि मराठवाड्याला अर्थसंकल्पात झुकते माप देण्यात आले नसले तरीही त्या भागाचा कायापालट व्हावा अशी हायस्पीड योजना दिली, पण सर्वात कहर म्हणजे एमएसएमई क्षेत्राला प्रचंड तरतूद करूनही विरोधक त्या क्षेत्राला काही नाही म्हणून बोंब ठोकत आहेत, ही बाब निश्चितच लांच्छनास्पद आहे. खरे तर हा अर्थसंकल्प विकसित भारताकडे पाऊल टाकणारा दमदार अर्थसंकल्प आहे असे फडणवीस म्हणाले. पण विरोधक म्हणतात ते खरे मानले तरीही या अर्थसंकल्पात १२ लाख कोटींची गुंतवणूक शेती, पशुपालन आणि मत्स्य शेती या क्षेत्रांत होणार आहे हे सत्य आहे. हे कसे नाकारता येईल. औद्योगिक सवलतींमुळे मराठवाडा आणि विदर्भ यांसारखे भाग विकासाच्या मार्गावर चालणार. ग्रोथ हबसाठी ५ हजार कोटी रुपये आणि प्रत्येक पाच वर्षांत ही योजना ही अत्यंत महत्त्वाची आहे. हा अर्थसंकल्प शेती आणि ग्रामीण विकासाला सर्वात महत्त्व देणारा आहे. जेथे ५९ टक्के ग्रामीण रोजगार आणि ४० टक्के सकल मूल्यवर्धित शेतीतून येते, तेथे कोणतेही सरकार शेतीकडे दुर्लक्ष करू शकणार नाही. देशांतर्गत आकडेवारीशिवाय महाराष्ट्राची आकडेवारीही अर्थसंकल्पात महाराष्ट्राला खूप काही देऊन गेली. काही अभ्यासकांचे आक्षेप बरोबर आहेत. एक म्हणजे शेतीसाठी त्यातल्या त्यात कमी तरतुदी आहेत आणि घर बांधणीसाठी फारसे काही मिळालेले नाही. करव्यवस्था जुनीच ठेवली. पण त्यापेक्षा महाराष्ट्राला काहीच मिळाले नाही हा आक्षेप बरोबर नाही. महाराष्ट्राला अर्थसंकल्पाने बरेच काही दिले.

# नंदुरबारमध्ये कर्तव्य बजावणाऱ्या मंडळ अधिकाऱ्यावर जीवघेणा हल्ला; डंपर मालकाच्या कृत्याने खळबळ

दैनिक वादळ वाता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

शासकीय कर्तव्य बजावत असताना महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांवर हल्ले होण्याचे सत्र थांबताना दिसत नाहीये. नंदुरबार तहसील कार्यालयातील गौण खनिज पथकातील मंडळ अधिकारी रवींद्र घोडके यांच्यावर अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या डंपर मालकाने लोखंडी पाईपने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे जिल्ह्यात सरकारी कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.दिनांक ३ फेब्रुवारी २०२६ रोजी, नंदुरबार तहसील कार्यालयाचे गौण खनिज पथक नियमित गस्तीवर होते. वावद ते शनिमांडळ रस्त्यावर पथकाने गौण खनिजाची वाहतूक करणारे एक वाहन संशयावरून तपासणीसाठी थांबवले. तपासणी दरम्यान डंपर चालकाकडे गौण खनिज वाहतुकीचा कोणताही वैध परवाना किंवा रॉयल्टीची कागदपत्रे आढळून आली नाहीत.या कारवाईमुळे संतप्त झालेला डंपर मालक राहुल पाटील याने पथकातील मंडळ अधिकारी रवींद्र घोडके यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि राहुल पाटील याने घोडके यांच्यावर लोखंडी पाईपने प्राणघातक हल्ला केला. इतकेच नव्हे तर त्याने उपस्थित कर्मचाऱ्यांनाही अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत धमकावले.



**जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन आणि कारवाईची मागणी:**–या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ दिनांक ०४ रोजी महसूल कर्मचाऱ्यांनी एकवटून नंदूरबार जिल्हाधिकारी, डॉ. मित्ताली सेठी यांना निवेदन दिले. शासकीय कामात अडथळा आणून अधिकाऱ्यावर जीवघेणा हल्ला करणाऱ्या राहुल पाटील याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी आणि गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

**कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यावर झालेला हा हल्ला संपूर्ण प्रशासनावर झालेला हल्ला आहे. अशा प्रवृत्तींना वेळीच चाप लागणे आवश्यक आहे. –महसूल कर्मचारी संघटना, नंदुरबार.**

# एस एस सी आणि एच एच सी बोर्डाचे अध्यक्ष अनिल साबळे यांचा त्यांच्या विद्यार्थ्यांनी केला सत्कार

दैनिक वादळ वार्ता

**गौतम बचुटे । केज**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ, छत्रपती संभाजीनगरचे विभागीय अध्यक्ष अनिल साबळे यांचा त्यांच्या विद्यार्थ्यांनी सत्कार केला.या बाबतची माहिती की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ, छत्रपती संभाजीनगरचे विभागीय अध्यक्ष अनिल साबळे हे सन १९९८-९९ मध्ये आम्ही बीड येथील शासकीय आय टी आय येथील स्टेनो ट्रेडच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाचे अध्यापन करीत होते.दि. ४ फेब्रुवारी रोजी त्यांचे विद्यार्थी जलील शेख सर, विजयानंद आरकडे सर, शौकत बेग आणि मी पत्रकार गौतम बचुटे आम्ही सर्वांनी साबळे सरांची भेट घेऊन सत्कार केला. यावेळी बोर्डाचे अध्यक्ष अनिल साबळे यांनी सर्वांची आस्थेवाईकपणे चौकशी केली.



# सोरापाडा यात्रोत्सवातील बैल बाजारात दोन कोटींची उलाढाल

## गावठी बैलांच्या आवकमुळे बाजारात उलाढालीत वाढ

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

अक्कलकुवा शहरालगत असलेल्या सोरापाडा येथील श्री महाकाली मातेच्या यात्रोत्सवानिमित्त यात्रेतील प्रसिद्ध बैलबाजारात विविध जातींचे सुमारे आठ ते दहा हजार बैलांची आवक होऊन यातील बैलांच्या खरेदी विक्रीतून सुमारे पावणे दोन ते दोन कोटीं रुपयांची उलाढाल झाल्याचे व्यापारी सूत्रांकडून सांगण्यात आले.

अक्कलकुवा शहरालगत असलेल्या सोरापाडा येथील श्री महाकाली मातेच्या यात्रोत्सवात आज दुसऱ्या दिवशी एकूण सुमारे आठ ते दहा हजार गावठी, खिल्लारी, नागोरी अशा विविध जातींच्या बैलांची आवक झाली यांतील सुमारे ३ हजार बैलांच्या खरेदी विक्रीतून सुमारे पावणेदोन ते दोन कोटी रुपयांची उलाढाल झाल्याचे बैल व्यापारी सूत्रांकडून सांगण्यात आले. याबाबत कृषी उत्पन्न बाजार बाजार समितीच्या सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार यावर्षी यात्रोत्सवातील बैल बाजारात



बैलांची चांगली आवक झाली होती या बैलांच्या खरेदी विक्रीतून सुमारे दीड कोटी रुपयांची उलाढाल झाली असून यात्रोत्सवात सर्वाधिक एक लाख रुपये विक्रमी किमतीची बैलजोडी विक्री झाल्याचे सांगण्यात आले बैल बाजार विक्रीतून व्यापारी आपल्या वाहनांमधून बैलांना वाहून नेत असताना काही वाहनांना पोलिसांनी अटकाव केल्याने आजच्या बैल बाजारात त्याचा परिणाम जाणवल्याचेही सांगण्यात आले.

# अक्कलकुवा येथे दुचाकीस्वारांना हेल्मेट सक्तीचे:सुभाष भोये

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी मोलगी । प्रतिनिधी**

दुचाकी चालवताना दुचाकीस्वारांना डोक्यावर हेल्मेट असणे बंधनकारक असून याबाबत सक्त अंमलबजावणी करण्यात येणार असल्याच्या सूचना देण्यासाठी पोलीस ठाण्यात आयोजित उपविभागीय पोलीस अधिकारी सुभाष भोये यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित बैठकीत पोलीस निरीक्षक सारंग नवलकर यांनी उपस्थित शांतता समितीचे सदस्य तसेच प्रसिद्धी माध्यम प्रतिनिधींच्या उपस्थितीत मार्गदर्शन केले.

जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस ,अप्पर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांनी जिल्ह्यातील दुचाकी स्वारांच्या अपघातात गत दोन वर्षात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या आश्चर्यकारक असून दरवर्षी त्यामध्ये वाढ होत आहे दुचाकी स्वारांच्या अपघातात जखमी होणारे व मृत्यू पावणाऱ्यांच्या संख्येला आटोक्यात आणण्यासाठी नंदुरबार जिल्ह्यात दुचाकीस्वारांना डोक्यावर हेल्मेट वापरणे सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे असून त्याची सक्त अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आल्याने अक्कलकुवा पोलीस ठाण्यात नुकत्याच झालेल्या बैठकीत पोलीस निरीक्षक सारंग नवलकर यांनी दुचाकी स्वरांनी डोक्यावर हेल्मेट वापरणे बाबत जनजागृती करण्यात येणार असून याबाबत शांतता



समितीच्या सदस्यांनी तसेच प्रसिद्धी माध्यम प्रतिनिधींनी याबाबत दुचाकी स्वारांना हेल्मेट सक्ती बाबत आपल्या परीने मार्गदर्शन करून जनजागृती करावी असेही आवाहन करण्यात आले. यावेळी शांतता समितीचे सदस्य पंचायत समितीचे माजी उपसभापती भाऊ राणा , विजय सोनार, दादमोहम्मद मक्राणी, कय्युम पठाण, छोटू हाश्मी, जीवनलाल भन्साली, अनिल जावरे आदी उपस्थित होते. दुचाकीस्वारांना डोक्यावर हेल्मेट वापरणे सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असून दुचाकीस्वारांनी हेल्मेट वापरणे बंधनकारक असून याबाबत व्यापक जनजागृती करून हेल्मेट वापर सक्तीचा केला जाणार असल्याची प्रतिक्रिया यावेळी पोलीस निरीक्षक सारंग नवलकार यांनी व्यक्त केली.

# माळेवाडीच्या भक्ती रोठेची जिल्ह्यात चमकदार कामगिरी

दैनिक वादळ वार्ता

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कला सांस्कृतिक आणि शिक्षण विभाग अंतर्गत जिल्हा परिषद अहिल्यानगर आयोजित जिल्हास्तर वैयक्तिक गीतगायन स्पर्धा अहिल्यानगर शहरात मोठ्या उत्साहात घेण्यात आल्या.किलबिल गटात जिल्हा परिषद सेमी इंग्लिश स्कूल माळेवाडीची इयत्ता दुसरीची विद्यार्थीनी भक्ती निलेश रोठे हिने वैयक्तिक गीतगायन' सर्धेत स्वतः हार्मोनियम वाजवून '' बलसागर भारत होवो  हे देशभक्तीपर गीत सादर केले.तिला सादरीकरणाचा जिल्ह्यातून दुसरा क्रमांक प्राप्त झाला.या यशासाठी तिला तिचे आजोबा चौधरी महाराज, वर्गशिक्षिका मीनाक्षी जाधव,कलाशिक्षक रज्जाक शेख, तसेच मुख्याध्यापक राजू भालेराव, मंगल सातुरे, आणि बाबासाहेब थोरात यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. भक्तीचा माळेवाडीचे सरपंच उपसरपंच आणि सदस्य,



शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्य, सोसायटी चेअरमन आणि संचालक, पोलिस पाटील, तंटामुक्त गाव समिती आदींनी शाळेत सत्कार केला.जिल्हा स्तरावरील यशाबद्दल श्रीरामपूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी , केंद्रप्रमुख केंद्रसमन्वयक आदींनी अभिनंदन केले आहे.

# महाराष्ट्र डिजिटल दीपस्तंभ अवॉर्ड २०२६ अमित रामगिरवार यांना जाहीर

दैनिक वादळ वार्ता

**उमरी । प्रतिनिधी**

ड्रिम फ्युचर फाउंडेशन आयोजित महाराष्ट्र डिजिटल दीपस्तंभ अवॉर्ड २०२६ अमित अशोकराव रामगिरवार यांना शैक्षणिक विकासासाठी समर्पित कर्तृत्ववान शिक्षकांचा गौरव साठी पुरस्कार जाहीर करण्यात आला. डिजिटल साक्षरतेतून आत्मनिर्भर तेकडे नेणारा आजच्या डिजिटल युगात संगणक ज्ञान हे लक्झरी नसून मूलभूत गरज आहे. शिक्षण म्हणजे फक्त डिग्री नव्हे, तर आयुष्य बदलण्याचं साधन आहे. या विचारातूनच नांदेड येथे केअर कॉम्पुटर इन्सटुट च्या माध्यमातुन अमित अशोकराव रामगिरवार यांनी पायाभरणी केली. संघर्षमय प्रारंभ पण ध्येय स्पष्ट सुरुवातीचा काळ सोपा नव्हता. ग्रामीण व सामान्य पार्श्वभूमीतील अनेक विद्यार्थी संगणकाला घाबरत होते. ऑनलाइन फॉर्म, ई-मेल, सरकारी पोर्टल्स, डिजिटल पेमेंट हे सगळं त्यांच्यासाठी अवघड होतं.पण अमित रामगिरवार सरांनी हार मानली नाही.ते म्हणत होते की भीती दूर केली की, शिकणं आपोआप सुरू होतं.डिजिटल सक्षमीकरणाची चळवळ बनली.आज त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी नोकरीत स्थिर झाले, काहींनी स्वतःचे CSC / Online Service Centers सुरू केले,काहींनी अकाउंटिंग, ढश्रश्रू, ऋड्ढ मध्ये करिअर घडवले, सामान्य नागरिक डिजिटल सेवांमध्ये आत्मनिर्भर झाले हीच त्यांच्या कार्याची खरी ओळख असल्याचे त्यांनी वार्ताहर यांच्याशी मुलाखत देतांना सांगितले. ड्रिम फ्युचर फाउंडेशन च्या वतीने महाराष्ट्र डिजिटल दीपस्तंभ अवॉर्ड २०२६ हे अमित अशोकराव रामगिरवार यांना जाहीर करण्यात आले त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# लोह्यात सेवा जनशक्ती पार्टी व शिवा संघटनेच्या वतीने प्रा.मनोहर धोंडे सर यांचा ६१ वा अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न

## प्रा.धोंडे सरांसारखे नेतृत्व सारखे तयार होण्यास ४० वर्ष लागतात–माजी आ.गोविंद अण्णा केंद्रे

## माझे आयुष्य हे गोरगरीबांसाठी समर्थीत करतो–प्रा.मनोहर धोंडे सर

**दैनिक वादळ वार्ता**
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

लोहा येथील व्यंकटेश गॉर्डन मध्ये सेवा जनशक्ती पार्टीचे पक्षप्रमुख तथा शिवा संघटनेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचा अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी कार्यक्रमाच्या उदगीरचे माजी आमदार गोविंद अण्णा केंद्रे होते तर प्रमुख व्याख्याते प्रसिद्ध हवामान तज्ञ पंजाबराव डख होते तर प्रमुख पाहुणे म्हणून लोहा न.प.चे नगराध्यक्ष शरद पा.पवार, कंधार न.प. चे नगराध्यक्ष शहाजीराजे नळगे, राज्य उपाध्यक्ष वैजेनाथ तोनसुरे, राज्य सरचिटणीस विठ्ठलराव ताकबिडे, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अण्णाराव पाटील पवार, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक दता पाटील दिघे,सेवा जनशक्ती पार्टीचे प्रथम नगरसेवक मयुर सावकार नळदकर, इंजि. अनिल माळगे,संजय कोठाळे आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी प्रथम समतेचे पुरस्कर्ते जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या मुर्तीस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व त्यानंतर दीप प्रज्वलन करून कार्यक्रमांचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी लोहा , कंधार, नांदेड,लातूर, हिंगोली, परभणी, चंद्रपूर, गडचिरोली ,सोलापुर यांच्यासहित राज्यातील सेवा जनशक्ती पॉर्टी,शिवा संघटना , समग्र शिक्षा अभियान,चे पदाधिकारी




कार्यकर्ते, नागरिक, शेतकरी आदीने प्रा. मनोहर धोंडे सर यांचा शाल पुष्पहार,खारिक खोबऱ्याचा हार , फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करून गायन पार्टीने गायन गाऊन भव्य अभिष्टचिंतन केले.यावेळी बोलताना माजी आमदार गोविंद अण्णा केंद्रे म्हणाले की, प्रा. मनोहर धोंडे सर यांच्यासारखे नेतृत्व तयार होण्यासाठी ४० वर्ष लागतात.प्रा. धोंडे सरांच्या वाढदिवसानिमित्त शेतकरी आलेत त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी हवामान तज्ञ पंजाबराव डख आलेत. पंजाबराव डख हे शेतकऱ्यांना चांगले मार्गदर्शन करतात नुकसानी पासून वाचवितात त्यांनी माझे २०० पोते सोयाबीन भिजण्यापासुन वाचविले. प्रा.धोंडे सरांचे राज्यात फार वजन आहे. मुख्यमंत्र्यांकडे सुध्दा वजन आहे. हे वजन एकना एक दिवस कामी येईल . ते एक ना एक दिवस आमदार, खासदार होतील. त्यांनी संघर्ष कमी पडू देऊ नये असे माजी आ. गोविंद अण्णा केंद्रे म्हणाले.तसेच यावेळी बोलताना सेवा जनशक्ती पार्टीचे पक्षप्रमुख तथा शिवा संघटनेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे सर म्हणाले की, माझे आयुष्य हे गोरगरीबासाठी, कार्यकर्त्यांसाठी समर्पित करतो . आमदार हे ५ वर्षाला विसरून जातात. प्रा. मनोहर धोंडे हे चळवळीतील माणुस आहे. येथे कार्यक्रमाला एवढ्या मोठ्या प्रमाणात माणसे आलीत ते पैसे देऊन आणले नाहीत. आमदारांच्या कार्यक्रमाला पैसे देऊन पाकिट देऊन माणसे आणतात. प्रा. मनोहर धोंडे हे आमदार नाही पण ४० वर्ष महाराष्ट्रातील ५ हजार गावात,५ राज्यात,देश,विदेशात शिवा संघटनेच्या माध्यमातून गेलो. माणसे किती गोळा केली ही सर्वात मोठी संपत्ती आहे. प्रा. मनोहर धोंडे यांनी दिलेले विचार हे पिढ्यांन पिढ्या राहतील. लोकशाही जिवंत राहिली पाहिजे देश महासत्ता झाला पाहिजे. भ्रष्टाचारातुन मिळणारे पद मला नको. स्वाभिमानाला ठेच लागु देयाची नाही.गोर गरीबांचे कामे करतो माझ्याकडे जे कामाला आले त्यांची जात मी कधी विचारली नाही.

प्रत्येकांनी आपल्या जातीचा धर्माचा गर्व केला पाहिजे पण इतराचा द्वेष करु नये. येथे आलेले ७५ टक्के लोक इतर जातीचे आहेत . माझे मन नितिमता साफ आहे.मी कुठेही गेल्यावर माझे कामे होतात. माझे कोणताही मंत्री काम करतो माझे वजन माजी आमदार गोविंद अण्णा यांना माहीत आहे.यापुढे लोहा –कंधार सह कुणालाही माझी मदत लागल्यावर त्यांना मदत करणार असे प्रा. मनोहर धोंडे सर म्हणाले.

यावेळी सेवा जनशक्ती पॉर्टी,शिवा संघटना, समग्र शिक्षा अभियान, यांच्यासहीत शेतकरी, नागरिक , मित्रमंडळी हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संपर्कप्रमुख इंजि.अनिल माळगे, शिवा कर्मचारी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर घोडके,लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बसवेश्वर धोंडे,मा.सरपंच कैलास धोंडे , सेवा जनशक्ती पार्टीचे तालुकाध्यक्ष गोविंद हाबगुंडे,शिवा संघटनेचे तालुकाध्यक्ष रविराज होळगे, उपाध्यक्ष साधु पाटील वडजे , गणेश घोडके,मनोज शेलगावकर, शिवा विद्यार्थी आघाडी चे तालुकाध्यक्ष– राजकुमार पिल्लोळे,अरुण राईकवाडे, अंकुश सोनवळे, संगमेश्वर चपटे,नागेश माचुंद्रे,कपिल भालके, आनंदराव वाळके,कपिल देशमुख, वैजनाथ चपटे,आदीने परिश्रम घेतले.

यावेळी कार्यक्रमाचे सुंदर सुत्रसंचलन प्रसिद्ध साहित्यिक तथा जेष्ठ पत्रकार बापु गायखर सर यांनी केले.

---

# अखेर बेकायदेशीर इमारतीवर बुलडोजर? अहेरी चार मजली इमारतीचे पाडकाम सुरू

## न्यायालयीन आदेशानंतर नगरपंचायतीची ठोस कारवाई

**दैनिक वादळ वार्ता**
**देसाईगंज । प्रतिनिधी**

गेल्या अनेक दिवसांपासून जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरलेल्या माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अजय कंकडालवार यांच्या बेकायदेशीर इमारत बांधकामावर अखेर आज प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. अहेरी नगर पंचायतीने दोन महिन्यांपूर्वी नोटीस बजावल्यानंतर, आज प्रशासनाने या अवैध बांधकामावर तोडकाम सुरू केल्याने जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

नेमके प्रकरण काय?

अहेरी लगत गडअहेरी भागात असलेल्या कंकडालवार यांच्या इमारतीचे बांधकाम नियमांचे उल्लंघन करून करण्यात आल्याची तक्रार होती. यावरून नगर पंचायतीने त्यांना दोन महिन्यांपूर्वीच कारवाईबाबत सूचित केले होते. मात्र, हे प्रकरण न्यायालयीन प्रक्रियेत आणि प्रशासकीय फेऱ्यात अडकल्याने कारवाई कधी होणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले होते.



प्रशासकीय कारवाईचा मुहूर्त

आज सकाळपासूनच प्रशासनाने चोख पोलीस बंदोबस्तात या इमारतीचे बांधकाम पाडण्यास सुरुवात केली. राजकीय दबावामुळे ही कारवाई रखडणार की काय? अशी शंका व्यक्त केली जात होती, मात्र शासन आणि न्यायालयाने हिरवा कंदील दाखवताच प्रशासनाने थेट कारवाईला सुरुवात करून 'कायदा सर्वांसाठी समान' असल्याचा संदेश दिला आहे.

**कंकडालवार यांच्या राजकीय प्रभावाला ओहोटी?**

एकेकाळी अहेरी आणि परिसरात दबदबा असलेले अजय कंकडालवार यांच्यासाठी हा मोठा राजकीय धक्का मानला जात आहे.

प्रभावात घट: स्थानिक स्तरावर त्यांचा प्रभाव दिवसेंदिवस कमी होत असल्याची चर्चा आधीच सुरू होती, त्यात या कारवाईमुळे त्यांच्या प्रतिमेला मोठी खीळ बसली आहे.

इतर विभागांचा ससेमिरा: सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, केवळ नगर पंचायतच नव्हे, तर इतरही काही सरकारी विभागांकडून कंकडालवार यांच्या व्यवहारांची चौकशी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे येत्या काळात त्यांच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची चिन्हे आहेत.

या कारवाईमुळे अहेरी परिसरातील इतर अवैध बांधकामधारकांचे धाबे दणाणले असून, कंकडालवार यांच्या पुढील राजकीय प्रवासावर याचे काय परिणाम होतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

---

## आमदार रामदास मसराम यांच्या प्रयत्नांना यश

# कोरची येथे नवीन विश्रामगृहास २.५७ कोटींचा निधी मंजूर

**दैनिक वादळ वार्ता**
**देसाईगंज । प्रतिनिधी**

कोरची तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार रामदास मसराम सातत्याने पाठपुरावा करत असून त्यांच्या ठोस प्रयत्नांना मोठे यश मिळाले आहे. कोरची येथे अत्याधुनिक सोयीसुविधांनी सुसज्ज अशा नवीन शासकीय विश्रामगृहाच्या बांधकामासाठी २ कोटी ५७ लाख रुपयांचा निधी शासनाने मंजूर केला आहे.कोरची तालुका हा आदिवासी व दुर्गम भागात येत असल्याने प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच विविध विभागांचे कर्मचारी यांना वास्तव्याच्या सुविधांचा अभाव जाणवत होता. ही बाब लक्षात घेऊन आमदार रामदास मसराम यांनी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळेच हा महत्त्वाचा विकासात्मक प्रस्ताव मंजूर झाला आहे.



या विश्रामगृहामुळे तालुक्यातील प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान होणार असून नागरिकांच्या प्रश्नांना वेळेत न्याय मिळण्यास मदत होणार आहे. तसेच बाहेरून येणाऱ्या अधिकाऱ्यांना सोयीस्कर व्यवस्था उपलब्ध होणार असल्याने कोरची तालुक्याच्या विकासाला नवी चालना मिळणार आहे.या निधी मंजुरीबद्दल कोरची तालुक्यातील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व विविध संघटनांनी आमदार रामदास मसराम यांचे अभिनंदन करून आभार व्यक्त केले आहेत. विकासासाठी कटिबद्ध असलेले आमदार रामदास मसराम यांचे नेतृत्व कोरची तालुक्यासाठी निश्चितच लाभदायक ठरत असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

---

## कंधार सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा कार्यकारिणी जाहीर!

# अध्यक्षपदी विनोद पाटील तोरणे तर सचिवपदी परमेश्वर पाटील जाधव यांची निवड

**दैनिक वादळ वार्ता**
**कंधार । प्रतिनिधी**

शासकीय विश्रामगृह कंधार येथे सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा २०२६ समिती कार्यकारणी निवड संदर्भात बैठकीचे आयोजन दि.३० जानेवारी रोजी करण्यात आलेले होते,या बैठकीत पुढील प्रमाणे सर्वानुमते कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

यावेळी अध्यक्ष विनोद पाटील तोरणे.सचिव परमेश्वर पाटील जाधव,कार्यअध्यक्ष धनराज पाटील लुंगारे,उपाध्यक्ष महेंद्र कांबळे, सहसचिव रमेश लुंगारे, कोषाध्यक्ष अमित मोरे ,सह कोषाध्यक्ष भगवान गिरे, संघटक नितीन कोकाटे, सह संघटक संदीप तोंडचिरे,प्रसिद्धी प्रमुख मारुती लुंगारे, युवराज शिंदे, गणेश उगले, शिवा तोंडचीरे,अजय डांगे, सल्लागार पदी बळीराम पवार पांडुरंग आगलावे आत्माराम लाडेकर



संभाजी लाडेकर कंठीराम लुंगारे माधव भालेराव रावसाहेब डांगे राम वरपडे उमाकांत जोगदंड बालाजी डफडे डीजी जाधव प्रदीप हुबाड यांची तर मिरवणूक प्रमुख पदी संतोष बोरगावे,गणेश मोरे शहाजी शिंदे अनिकेत जाधव विकास गारोळे त्रिभुवन मोरे सौरभ मोरे बालाजी कांबळे कपिल जोंधळे शंकर लुंगारे विलास सांगवे राजेश भुते अंकुश कदम माधव लुंगारे सुरेश कल्याणकर गोविंद हेडगे आणि अनिल लाडेकर राहुल कल्याणकर जगन्नाथ धोंडगे शिवकुमार धोंडगे गुलाब जाधव सुनील हराळे अजय मोरे कृष्णा डांगे अजिंक्य यन्नावार यांची निवड करण्यात आली.

---

# चिंचोली(बु)येथील युवकांचा शेतकरी संघटनेत प्रवेश

**दैनिक वादळ वार्ता**
**जिवती । प्रतिनिधी**

राजुरा तालुक्यातील चिंचोली (बु) येथील तरुण युवकांनी शेतकरी संघटनेच्या विचार प्रणालीवर व माजी आमदार अँड वामनराव चटप यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत २ फेब्रुवारीला येथील अनेक तरुण युवकांनी स्वयंस्फूर्तीने माजी आमदार चटप साहेब,जिल्हा उपाध्यक्ष प्रभाकर ढवस, तालुका अध्यक्ष कपिल इद्दे यांच्या उपस्थितीत शेतकरी संघटनेत प्रवेश केला. यावेळी उपस्थित मधुकर चिंचोलकर, पुरुषोत्तम अंगलवार, बाबाजी रोहणे, शंकर सत्रे, विशाल जीवतोडे, विलास हजारे, पांडुरंग चेंदे, ताराबाई वासेकर, विठोबा लोणारे आदी नेते उपस्थित होते. प्रवेश करणाऱ्या युवकांमध्ये चिंचोली येथील तंटामुक्ती समिती



अध्यक्ष सौरव एकोणकर, आकाश बोरकुटे, अंकुश डाहूले, आकाश बोबडे, दिलीप नेव्हारे, गुलाब बोटरे, बंडू बोटरे, रुपेश चनकापुरे, कण्हया वाटेकर, रुपेश ठाकूर, गोलू देशमुख, अशोक शेंदरे, राजकुमार मोटघरे, रवी बोटरे, प्रवीण मडावी, मंगेश निब्रड, श्रीकांत बावणे, राजू चेंदे, नितीन मडावी आदी युवकांचा समावेश होता.

---

# कासार शिरसी पोलीस स्टेशनची इमारत जीर्ण कर्मचारी करतात जीव मुठीत ठेवून काम

**दैनिक वादळ वार्ता**
**कासार शिरशी । प्रतिनिधी**

शंभर वर्षांपूर्वी बांधण्यात आलेली कासार शिरसी येथील पोलीस स्टेशनची इमारत आता जीर्ण झाली आहे या असुरक्षित इमारतीत कर्मचारी मात्र जीव मुठीत धरून काम करीत आहेत ही जुनी इमारत पाडून या ठिकाणी नवीन वास्तू उभारण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे

इसवी सन १९०१ मध्ये निजामाच्या काळात तत्कालीन निजाम सरकारने कासार शिरसी येथे पोलीस स्टेशन स्थापन केले होते त्यावेळी येथील प्राथमिक शाळा व पोलीस स्टेशनच्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले होते पण अलीकडच्या काळात महाराष्ट्र शासनाने निजामकालीन जुन्या शाळा पाडल्या व त्या ठिकाणी नव्या इमारती उभारल्या आहेत त्याच धर्तीवर निजामकालीन बांधण्यात आलेल्या पोलीस स्टेशनच्या इमारती पाडून त्या ठिकाणी नवीन वास्तू उभारावी अशी मागणी करण्यात येत आहे सध्या कासार शिरशी येथील पोलीस स्टेशन इमारतीचा कालावधी संपूण गेला आहे ती जीर्ण अवस्थेत आहे सध्याची भूकंपप्रवणपरिस्थिती व अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्तीत ही वास्तू केव्हा उध्वस्त होणार हे सांगता येणे कठीण आहे अशा स्थितीत सुद्धा या इमारतीत कर्मचारी जीव मुखी ठेवून कार्य करत आहेत

सध्या कासार शिरशीत जनतेचे रक्षकच असुरक्षित बनल्याने प्रशासनाच्या कामाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे सध्याच्या इमारतीभोवती तात्पुरते शेड उभे करण्यात आले असून मुख्य कामकाज जुन्याच इमारतीत चालते नूतन वास्तू उभारणीसाठी बांधकाम विभागाच्या वतीने अनेक वेळा या ठिकाणचा सर्वे करण्यात आल्याचे सांगण्यात आले पण कुठे माझी शिकली कळत नाही या असुरक्षित इमारतीच्या जागी नवीन वास्तू उभारण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे.

# शिवजयंती २०२६ उत्सव शांततेत व सर्व समावेशक साजरी करण्याचा संकल्प

## सहाय्यक पोलीस अधीक्षक वेंकटराम यांच्या प्रमुख उपस्थितीत केज येथे शांतता कमिटी बैठक संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

शिवजयंती उत्सव २०२६ हा शांततेत,शिस्तबद्ध व सामाजिक सलोख्याच्या वातावरणात साजरा व्हावा,या उद्देशाने केज पोलीस ठाणे येथे दि. ४ रोजी दुपारी १२ वाजता शांतता कमिटी बैठकीचे आयोजन करण्यात आले. सहाय्यक पोलीस अधीक्षक वेंकटराम यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या बैठकीत पोलीस प्रशासन,शिव जयंती उत्सव समित्या, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार बांधव व विविध शासकीय विभागांचे अधिकारी सहभागी झाले होते.या बैठकीस केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना शिवजयंती उत्सव हा केवळ उत्सव न राहता सामाजिक ऐक्याचा आदर्श ठरावा,असे आवाहन केले.शहर व तालुक्यातील शिवजयंती उत्सव समित्यांचे अध्यक्ष, सचिव,पदाधिकारी, कार्यकर्ते,शिवप्रेमी तसेच पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**डीजे मुक्त शिवजयंती**
**सांस्कृतिक कलेला प्राधान्य**

बैठकीत सर्वानुमते एकमुखी निर्णय घेण्यात आला की,यंदाच्या शिव जयंती उत्सवात डीजे पूर्णतः बंद ठेवून पारंपरिक सांस्कृतिक कला पथकांना प्राधान्य दिले जाईल.यामुळे ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण मिळेल तसेच शिव जयंती चा सांस्कृतिक व ऐतिहासिक संदेश प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचेल,असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.



**शहर स्वच्छता,अपूर्ण रस्ते व सुरक्षिततेवर भर**

केज शहरातील एकूण परिस्थितीचा आढावा घेताना मिरवणुकीदरम्यान लाईट पोल,विद्युत वाहिन्या यामुळे उद्भवणारे धोके कमी करण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला.तसेच शहरातील अपूर्ण रस्ते व नाल्यांची कामे १५ फेब्रुवारीपूर्वी पूर्ण करावीत,याबाबत प्रशासनाने गांभीर्याने विचार करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त झाले.

**तरुणांचा सहभाग व महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था**

पोलीस बंदोबस्ताच्या वेळी स्थानिक तरुणांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले.त्याचबरोबर महिलां साठी स्वतंत्र व सुरक्षित व्यवस्था निर्माण करून, महिला,वृद्ध,लहान मुले व ग्रामीण भागातील नागरिक मोठ्या संख्येने उत्सवात सहभागी होतील,अशा सर्व समावेशक नियोजनावर बैठकीत विशेष भर देण्यात आला.

**सामाजिक कार्यकर्त्यांचे मार्गदर्शन**

यावेळी योगेश गायकवाड भाई मोहन गुंड,हनुमंत भोसले सर आदी सामाजिक कार्यकर्त्यांनी आपली मनोगते व्यक्त करत उत्सव अधिक शिस्तबद्ध,सुरक्षित व प्रेरणादायी कसा होईल, याबाबत मौलिक सूचना मांडल्या.

**शांतता,समता व सुरक्षिततेचा संदेश**

एकूणच,शिवजयंती उत्सव २०२६ हा शांतता, सामाजिक ऐक्य, पर्यावरण पूरक व सांस्कृतिक मूल्ये जपणारा ठरावा,यासाठी पोलीस प्रशासन व नागरिकांनी एकत्रितपणे जबाबदारी पारपाडण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

# नागझरीच्या कन्येचा दिल्लीत होम रन; राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेत महाराष्ट्राला कांस्यपदक!

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

दिल्ली येथे नुकत्याच संपन्न झालेल्या राष्ट्रीय बेसबॉल १९ वर्षांखालील मुली स्पर्धेत महाराष्ट्र संघाने आपल्या अष्टपैलू खेळाचे प्रदर्शन करत कांस्यपदक पटकावले आहे.या विजयामुळे संपूर्ण महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून,बीड जिल्ह्याच्या शिरपेचातही मानाचे पान जोडले गेले आहे.नागझरीच्या कन्येची दैदीप्यमान कामगिरी या विजयी संघात केज तालुक्यातील नागझरी गावचीसुकन्या कु.प्रांजली चंद्रसेन मुद्रिका चौरे हिने आपल्या उत्कृष्ट खेळाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. प्रांजली ही नागझरी गावच्या सरपंच सौ. मुद्रिका चंद्रसेन चौरे यांची कन्या आहे.ग्रामीण भागातील एका खेळाडूने राष्ट्रीय स्तरावर मजल मारून कांस्यपदक प्राप्त केल्यामुळे परिसरात आनंदाचे वातावरण आहे.



स्पर्धेचा थरार देशभरा तील विविध राज्यांच्या तगड्या संघांना पराभूत करत महाराष्ट्र संघाने उपांत्य फेरीपर्यंत धडक मारली होती.अत्यंत चुरशीच्या झालेल्या सामन्यांमध्ये प्रांजलीने बेसबॉल मधील दोन्ही आघाड्यांवर चमकदार कामगिरी केली.तिच्या या यशात तिचे प्रशिक्षक,आई -वडील आणि संघ सहकाऱ्यांचे मोलाचे योगदान लाभले आहे.

**कौतुकाचा वर्षाव**

प्रांजलीच्या या यशाबद्दल केज तालुक्यातील राजकीय,सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांकडून तिचे अभिनंदन केले जात आहे.एका सरपंचाची कन्या जेव्हा खेळाच्या मैदानात राज्याचे नाव उंचावते, तेव्हा ते ग्रामीण भागातील इतर मुलींसाठी प्रेरणादायी ठरते,अशा भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या आहेत. प्रांजलीने मिळवलेले हे यश केवळ तिचे नसून संपूर्ण गावाचा सन्मान आहे.जिद्द आणि चिकाटी च्या जोरावर ग्रामीण भागातील मुलेही राष्ट्रीय स्तरावर चमकू शकतात, हे तिने सिद्ध केले आहे. विजयी संघाचे आणि कु. प्रांजली मुद्रिका चंद्रसेन चौरे हिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# तळोदा तालुक्यात पशुधनासाठी आरोग्य कवच; ढवळे विहीर व अमोनी येथे भव्य वंधत्व निवारण शिबिरे संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

पशुधनाचे आरोग्य सुदृढ राहावे आणि दुग्धोत्पादनात वाढ व्हावी या उद्देशाने पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागामार्फत तळोदा तालुक्यातील ढवळे विहीर आणि अमोनी येथे विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरांच्या माध्यमातून सुमारे ५०० हून अधिक पशुधनावर उपचार करून शेतकऱ्यांना मोठा दिलासा देण्यात आला आहे.दिनांक ३ फेब्रुवारी २०२६ रोजी मौजे ढवळे विहीर येथे आयोजित शिबिरात प्रामुख्याने (लाळ्या खुरकुत) लसीकरणावर भर देण्यात आला. पावसाळी आणि बदलत्या हवामानात जनावरांना होणाऱ्या आजारांपासून वाचवण्यासाठी २४० जनावरांचे लसीकरण व जंतनिर्मूलन करण्यात आले. यावेळी तज्ज्ञांनी गर्भधारणा तपासणी व वंधत्व निवारणाबाबत पशुपालकांना मार्गदर्शन केले. या उपक्रमासाठी सहाय्यक आयुक्त डॉ. अरुण महाकाळ, डॉ. अजय मोळके यांच्यासह राजेश



पावरा, नितीन मगरे व ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले.३१ जानेवारी २०२६ रोजी अमोनी (पुनर्वसित रेवा नगर) येथे पार पडलेल्या शिबिरात पशुपालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे येथे केवळ मोठ्या जनावरांवरच नव्हे, तर पक्ष्यांसाठीही (कोंबड्या) औषधोपचार उपलब्ध करून देण्यात आले.

**शिबिरातील उपचारांची आकडेवारी**

एकूण जनावरे: २७० दाखल.
कृत्रिम रेतन: ३ गायी व ४ म्हशींवर यशस्वी प्रक्रिया.
तपासणी: १६ म्हशी व ४ गायींची वंधत्व तपासणी.
औषधोपचार: ८३ जनावरांवर विविध आजारांसाठी उपचार.
पक्षी: कोंबड्यांना अँटिबायोटिक व ड्वारमींग पावडरचे वाटप.

या शिबिरास जिल्हा पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त डॉ. तुषार गिते, डॉ. अरुण महाकाळ, डॉ. गौतम तोटकवार आणि स्थानिक प्रतिनिधी सदाभाऊ ठाकरे, तांबोळी व इतर कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून यशस्वी केले. पशुसंवर्धन विभागाच्या या उपक्रमामुळे पशुधनाची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होणार आहे. वेळेवर झालेले लसीकरण आणि वंधत्व निवारण उपचारांमुळे भविष्यात दुग्धोत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत होईल, असा विश्वास विभागातर्फे व्यक्त करण्यात आला आहे.

# लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत शुभांगी साठे यांचे घवघवीत यश

## वाटेगाव सह महाराष्ट्राचा मान उंचावला

दैनिक वादळ वार्ता
**वाटेगाव । प्रतिनिधी**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या भूमीत जन्मलेल्या कन्येने आपल्या प्रज्ञा,प्रतिभा आणि अथक परिश्रमाच्या जोरावर लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.वाटेगाव येथील शुभांगीताई साठे यांनी प्रशासकीय सेवेत प्रवेश करत संपूर्ण महाराष्ट्राचा मान उंचावला आहे. सामान्य कुटुंबातून आलेल्या शुभांगी ताईंनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शिक्षण,स्पर्धा परीक्षा आणि सामाजिक भान यांचा समतोल साधला.त्यांच्या या यशा मुळे वाटेगाव परिसरात आनंदाचे वातावरण असून सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शुभांगीताई साठे यांचा प्रशासकीय सेवेतला प्रवास लोकहितासाठी अधिक यशस्वी, कर्तव्यदक्ष आणि प्रेरणादायी ठरो,अशा सदिच्छा



व्यक्त केल्या जात आहेत.त्यांच्या या यशामुळे अनेक तरुण, तरुणींना,विशेषतःग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नवी दिशा व प्रेरणा मिळणार आहे. शुभांगीताई साठे यांना खूप खूप अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# व्यसनांपासून दूर राहा,कर्करोगाला हरवा! तळोद्यात 'बीजेस' व 'सहयोग ग्रुप'तर्फे भव्य प्रबोधन

दैनिक वादळ वाता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

बदलती जीवनशैली आणि वाढती व्यसनाधीनता कर्करोगाला निमंत्रण देत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी व्यसनांपासून दूर राहून निरोगी जीवनशैलीचा अंगीकार करावा, असे आवाहन आरोग्य तज्ज्ञांनी येथे केले. जागतिक कर्करोग दिनानिमित्त शहरातील प्राचार्य गो. हू. महाजन न्यू हायस्कूलमध्ये भारतीय जैन संघटना आणि सहयोग सोशल ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हायस्कूलचे प्राचार्य डॉ. अमरदीप महाजन होते. प्रमुख व्याख्याते म्हणून धडगावचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. कांतीलाल पावरा, वैद्यकीय अधिकारी डॉ. विशाल चौधरी आणि दंतचिकित्सक




डॉ. गौरव शुक्ला यांनी विद्यार्थ्यांना कर्करोगाची लक्षणे, कारणे आणि उपाययोजना यावर सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. पावरा यांनी सांगितले की, आजचा युवक व्यसनांच्या आहारी जात असून ते कर्करोगाचे मुख्य कारण ठरत आहे. तर डॉ. शुक्ला यांनी मुखाच्या कर्करोगाबाबत सावध करत तंबाखूजन्य पदार्थांपासून लांब राहण्याचा सल्ला दिला. बीजेसचे जिल्हाध्यक्ष ड.अल्पेश जैन व प्रा. भगवान चिने यांनीही आहाराचे महत्त्व आणि प्रतिबंधात्मक उपायांवर प्रकाश टाकला. चांगल्या गोष्टींचे व्यसन लावा: प्राचार्य डॉ. महाजनः- अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. अमरदीप महाजन म्हणाले की, युवकांनी केवळ व्यसनांपासून दूर राहून चालणार नाही, तर त्यांनी वाचन, व्यायाम आणि सामाजिक कार्यासारख्या चांगल्या गोष्टींचे व्यसन लावून घेतले पाहिजे. कर्करोग मुक्तीचा हा संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या घरापर्यंत आणि समाजापर्यंत पोहोचवावा. कार्यक्रमास बीजेसचे शहराध्यक्ष राकेश जैन, उपमुख्याध्यापक सुनील सूर्यवंशी, प्रा. राजाराम राणे, डॉ. नारायण जाधव, प्रा. पूजा जैन, शरद सूर्यवंशी, रमेश कुमार भाट, चेतन धानका यांसह शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती देवीच्या प्रतिमा पूजनाने झाली. सूत्रसंचालनः एच. पी. चौधरी. यांनी केले तर आभारः पर्यवेक्षक पी. आर. वळवी. यांनी मानले या स्तुत्य उपक्रमाबद्दल शाळा प्रशासन आणि पालकांनी बीजेस व सहयोग सोशल ग्रुपचे विशेष कौतुक केले आहे.

# साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या विद्यार्थ्याला राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचलित,साने गुरुजी निवासी विद्यालयाचा विद्यार्थी चि.आदित्य अरविंद विद्यागर याची १९ वर्ष महाराष्ट्र राज्य शालेय सॉफ्टबॉल संघात राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झालेली होती.१९ वर्ष ६९ वी शालेय राष्ट्रीय सॉफ्ट बॉल स्पर्धा नागपूर येथे दि.,३० जानेवारी २०२६ ते २ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संपन्न झाली. या स्पर्धेत महाराष्ट्र राज्य संघास सुवर्ण पदक प्राप्त झाले आहे.सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थी चि.आदित्य विद्यागर याचा सत्कार जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज



यांच्या वतीने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,बीड येथे संपन्न झाला.आदित्यचा सत्कार करताना,बीड जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्यागर साहेब, बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ संस्थेचे अध्यक्ष ड. उद्धवराव कराड सर,श्री. ढाकणे सर,काळे सर, होसुरकर सर,पाटील सर, रेवन्नाथ शेलार सर,करंडे सर,जाहेर सर,बाळू सर तसेच प्राचार्य डॉक्टर कविता कराड गित्ते उपस्थित होते.आदित्यला सानप सर,शेलार सर, राठोड सर,तरकसे सर यांचे मार्गदर्शन लाभले होते.सर्वांनी सत्कार करून त्याच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# पती इच्छे विरुद्ध अनैसर्गिक कृत्य करून हिंसाचार करीत असल्याची तक्रार

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

केज तालुक्यातील एका विवाहितेने तिचा पती हा तिच्या इच्छे विरुद्ध तिच्याशी अनैसर्गिक संभोग करून घेत घेण्यासाठी दहा लाखाची मागणी करून तिचा शारीरिक व मानसिक छळ करीत असल्या प्रकरणी नवऱ्यासह सासू सासरे आणि दोन नंदा आणि नंदावी अशा सहा जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. केज तालुक्यातील एका गावात एका विवाहित महिलेचा पती हा तिच्याशी जबरदस्तीने वारंवार अनैसर्गिक पद्धतीने संभोग करून फ्लॅट घेण्यासाठी बाहेरहून दहा लाख रु. ची मागणी केली.तिचा शारीरिक व मानसिक छळ करून




तिला मारहाण करीत आहे. तसेच कुटुंबातील सदस्य देखील तिचा शारीरिक व मानसिक छळ करून पैशाची मागणी करीत आहेत.
या प्रकरणी सदर महिलेने केज पोलीस ठाण्यात तिच्या पती आणि सासू, सासरे, दोन नंदा व दोन नांदावी अशा सात जणांच्या विरुद्ध गु. र. नं. ५२/२०२६ भा. न्या. सं. ८५, ६४, ११५(२), ३५१(२),३५२, ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
या प्रकरणी पिंक पथकाचे पोलिस उपनिरीक्षक प्रकाश शेळके हे तपास करीत आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077